अंतिम

# महाराष्ट्र राज्याकरिता

## नियंत्रण कालावधी जुलै २०२० ते जून २०२३.

# ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकष

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

मार्च, २०२२

# ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषाचा मसुदा

# नियंत्रण कालावधी (२०२०-२३.)

१. **पार्श्वभूमी**

१.१. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) अधिनियम, २००५, (यापुढे अधिनियम म्हणून संदर्भित) महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे नियमन करण्याच्या हेतूने तसेच राज्यातील जलसंपत्तीचे कुशल, समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता लागु करण्यात आला होता. सदर अधिनियम राज्य शासनाच्या अधिसुचना क्र. समिती-२००५/(७२/०५) /१/जसंअ दि. ०८/०६/२००५ अन्वये अंमलात आला. त्यानंतर, अधिनियमातील विनिर्दिष्ट कार्ये पार पाडण्यासाठी अधिसुचना क्र. मजनिप्रा निवड २००५/७८/०५ दि.१२/०८/२००५ अन्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (यापुढे प्राधिकरण म्हणून संदर्भित) ची स्थापना करण्यात आली.

१.२. प्रत्येक नदी खोऱ्यातील लाभार्थींच्या किंवा उपभोक्त्यांच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर, सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय, कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तित होईल अशा तऱ्हेने पाण्याची दर पध्दती (जल प्रशुल्क पध्दती) ठरविणे आणि उप-खोरे, नदी-खोरे आणि राज्यस्तरावरील पाणीपट्टी आकारण्याचे निकष ठरविणे हे प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये आणि कर्तव्यांपैकी एक [अधिनियमातील कलम ११(घ)] आहे.

या तरतुदीनुसार उपखोरे, नदीखोरे आणि राज्यस्तरावर जलप्रशुल्क पध्दती आणि त्यासाठीचे निकष निश्चित करावे लागणार आहेत. प्राधिकरणाने राज्यातील जलप्रशुल्कात समानता असावी या हेतूने फक्त राज्यस्तरीय जलप्रशुल्क निर्धारणाचे निकष निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

१.३. अधिनियमातील कलम ११(प) नुसार प्राधिकरण दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरिक्षण करील.

१.४. अधिनियमातील (कलम ३१ चा उपकलम १, कलम ११ मधील उपकलम (घ) व (प) चे एकत्रित वाचन) केल्यास त्याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन जलसंपदा विभागाचे

मान्यतेनंतर प्राधिकरणाने दि. १५/१०/२०१३ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) विनियम, २०१३ अधिसूचित केले.

१.५ जानेवारी २०१८ मध्ये दुसरे जलप्रशुल्क आदेश निर्गमित केल्यानंतर, प्राधिकरणाने पूर्वानुभवाच्या आधारे राजपत्रातील भाग ४ (क) दि. २४/०५/२०१९ रोजीच्या स्वतंत्र अधिसूचनेद्वारे सदर जलप्रशुल्क निर्धारणाचे विनियम निरसित करण्यात आले. तदनंतर, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (शुल्क, आकार व अन्य प्राप्ती) विनियम, २०१९ दि. २९/०८/२०१९ रोजी अधिसूचित करण्यात आला. प्राधिकरणाने, ठोक जलप्रशुल्क निर्धारणाची पारदर्शक व सातत्यपूर्ण कार्यपद्धत निश्चित करण्याच्या उद्देशाने व तिचे नियतकालिक पुनर्विलोकन व पुनरिक्षण करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) मार्गदर्शक सूचना, २०१९ दि. १४/११/२०१९ रोजी अधिसूचित केल्या.

१.६ प्रचलित जलप्रशुल्क जून २०२० पर्यंत लागू आहे. त्यामुळे, प्राधिकरणाने जलप्रशुल्काच्या पुनर्विलोकनाची प्रक्रिया सुरु केली आहे. सेवा पुरवठादारांकडून आधारभूत माहितीसह प्रारूप ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव ऑक्टोबर २०२१ मध्ये प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाने प्रारूप ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकष केले आणि सल्लामसलत प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यातील निवडक तज्ञ् समुहा समवेत सल्लामसलत डिसेंबर २०२१ मध्ये पार पाडली. तज्ञ समूहांतील विविध तज्ञांचे प्राप्त अभिप्राय / सूचना विचारात घेवून प्राधिकरणाने निकषाचा प्रारूप दुसऱ्या टप्प्यातील लाभार्थी जनतेशी करावयाच्या सल्लामसलतीसाठी सुधारित केला.

१.७ जलप्रशुल्क निकषाचा मसुदा सुधारित केल्यानंतर दिनांक १९ जानेवारी, २०२२ च्या बैठकीत प्राधिकरणाने जलप्रशुल्क निर्धारणाच्या निकषांचा सुधारित मसुदा व त्यानुसार केलेला ठोक जलप्रशुल्क प्रस्तावाचा मसुदा अशा दोनही मसुद्यांस मान्यता दिली. प्राधिकरणाच्या मान्यतेने हे मसुदे प्राधिकरणाच्या www.mwrra.org या संकेतस्थळावर अधिनियमातील कलम ११(घ) नुसार लाभार्थ्यांच्या मतांची खात्री करुन घेण्यासाठी दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी ठेवण्यात आले. राज्यस्तरीय दोन मराठी

(दैनिक लोकमत व दै. पुण्यनगरी) व एका इंग्रजी (टाईम्स ऑफ इंडिया) वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करुन ३० दिवसांचे मुदतीत म्हणजे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत लाभार्थ्यांकडून अभिप्राय/सूचना मागविण्यात आल्या. याशिवाय दोन्ही मसुद्यांच्या क्षेत्रीय विभाग/उपविभागीय कार्यालयात लाभार्थ्यांकरिता उपलब्ध ठेवण्यासाठी पाचही पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना प्रती पुरविण्यात आल्या. मसुद्यांच्या प्रती संबंधित विविध विभाग प्रमुखांनाही पाठविण्यात आल्या. लाभार्थ्यांना त्यांचे अभिप्राय ई-मेलद्वारे, पोस्टाने अथवा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध केलेल्या गुगल लिंकद्वारे सादर करण्याचा पर्याय देण्यात आला होता.

१.८ राज्यस्तरीय वृत्तपत्रातील नोटीसला अनुसरुन सुमारे ६० लाभार्थ्यांचे / उपभोक्त्यांचे अभिप्राय विहित मुदतीत प्राप्त झाले.

१.९ उपभोक्त्यांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायांवर काळजीपूर्वक विचार केल्यानंतर प्राधिकरणाने दि. २५ मार्च, २०२२ च्या बैठकीत ठोक जलप्रशुल्क निर्धारणाच्या निकषाचा मसुदा आणि ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव अंतिम केला.

## २. कायदा व इतर समर्थनीय दस्ताऐवज :

सदर मसुदा निकष खालील तरतुदींच्या अनुषंगाने तयार केला आहे;

अ) मजनिप्रा अधिनियम, २००५ वेळोवेळी केलेल्या सुधारणांसह

ब) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ (मपाअ १९७६)

क) महाराष्ट्र प्रादेशिक नगरनियोजन अधिनियम १९६६ (MRTP Act १९६६)

ड) महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ (मसिंपशेव्य अधिनियम,२००५)

ई) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९

फ) ठोक जलप्रशुल्क निर्धारण २०२०-२३ वरील दृष्टिनिबंध (ऑक्टोबर २०१९)

ग) मजनिप्रा (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश

काढणे) मार्गदर्शक सूचना, २०१९ (यापुढे मार्गदर्शक सूचना म्हणून संदर्भित) याशिवाय आतापर्यंत आलेले अनुभव व अडचणी यथोचितरित्या विचारात घेतल्या आहेत.

**३. जलप्रशुल्क आदेशाची प्रयोज्यता (Applicability) :**

प्राधिकरणाचे जलप्रशुल्क आदेश, महाराष्ट्र राज्यातील संबंधित कार्यक्षेत्रातील सर्व ठोक पाणीपुरवठा गट [Bulk Water Supply Entity (BWSE)] आणि ठोक पाणी वापरकर्ता असलेला वैयक्तिक शेतकरी यासह अन्य ठोक पाणी वापरकर्ता गट [Bulk Water User Entity (BWUE)] अथवा अन्य कोणताही संबंधित वापरकर्ता यांस, नियंत्रण कालावधीसाठी आणि त्यास प्राधिकरणाने दिलेल्या मुदतवाढ/मुदतवाढीसाठी, जलप्रशुल्कामध्ये केलेल्या अथवा न केलेल्या वाढीसह लागू राहतील.

याशिवाय, अन्य सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रातील कंपनी, संघटना, संस्था इत्यादी अन्य गटाच्या मालकीच्या किंवा व्यवस्थापन होत असलेल्या जलसंपत्ती प्रकल्पातून ठोक पाणी पुरवठा होत असल्यास अशा सर्व ठोक पाणी पुरवठा गटास व ठोक पाणी वापर गटास, दृष्टिनिबंधामधील विहित केलेल्या पद्धतीनुसार पारित केलेले राज्यस्तरीय जलदर आदेश जोपर्यंत असे ठोक पाणीपुरवठा गट निर्देशित केल्यानुसार स्वतः प्रस्तावित करून प्राधिकरणाकडून स्वतंत्र जलदर निश्चित करुन घेतील किंवा प्राधिकरण स्वतः पुढाकार घेऊन अशाऊ ठोक पाणीपुरवठा गटासाठी स्वतंत्र दर निर्धारित करील, यापैकी जे आधी होईल, तो पर्यंत लागू राहतील.

**४. निकषाची वैधता :**

हे निकष दि. ०१/०७/२०२२ ते ३०/०६/२०२५ या तीन वर्षाच्या नियंत्रण कालावधीसाठी वैध राहतील. प्राधिकरणाने अधिनियमातील कलम ११ (प) नुसार प्रचलित दरांचे पुनर्विलोकन केले आणि जुलै २०२० ते मार्च २०२२ मध्ये प्रचालन व परिरक्षणावर झालेला प्रत्यक्ष खर्च, आकारणी आणि कोविड-१९ या साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावाने समाजाच्या सर्व घटकांवर झालेला परिणाम विचारात घेऊन सुधारित दर लागू होईपर्यंत प्रचलित दर चालू ठेवण्याचा

निर्णय घेतला. हा नियंत्रण कालावधी प्राधिकरणाने जलप्रशुल्क मार्गदर्शक सूचना २०१९ च्या परिच्छेद २(१४) नुसार विचारपूर्वक ०१/०७/२०२२ ते ३०/०६/२०२५ पुनर्निर्धारित केला आहे. प्राधिकरण, निकषांच्या कोणत्याही पुनर्विलोकन व पुननिरिक्षण साठी मार्गदर्शक सूचनांच्या परि. ३ मध्ये नमूद केलेली कार्यपद्धती अवलंबेल.

**५. सेवा पुरवठादाराकडून ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव :**

मार्गदर्शक सूचनांच्या कलम ३(२) नुसार ठोक पाणी पुरवठा गटाने आधारभूत माहितीसह ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव ऑक्टोबर २०२१ मध्ये सादर केला.

**६. स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्च :**

६.१ अधिनियमातील कलम ११ (घ) नुसार स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्चामध्ये राज्यातील जलसंपदा प्रकल्पांचा सिंचन व्यवस्थापन, प्रशासकीय, कार्यचालन व परिरक्षण खर्च अंतर्भूत आहे. मार्गदर्शक सूचानांमध्ये परिभाषित शब्दांच्या केलेल्या व्याख्या खालील प्रमाणे आहेत;

*२ (१५) "प्रशासकीय खर्च"याचा अर्थ, विभागीय कार्यालय व वरिष्ठ स्तरावरील कार्यालयांनी केलेला प्रशासकीय खर्च असा आहे, ज्यात केवळ सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासनासाठी प्रत्यक्ष नेमलेल्या कर्मचा-यांचे वेतन व भत्ते, आणि लेखा मानकानुसार प्रशासकीय शीर्षाखालील अनुज्ञेय नसून यात अन्य तत्सम खर्चाचा सुध्दा समावेश असेल, असा आहे;*

*२ (१६) "सिंचन व्यवस्थापन खर्च"याचा अर्थ, सिंचन व्यवस्थापन शाखा कार्यालये व उप विभागीय कार्यालयाचा खर्च असा असून तो केवळ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, पाणी पाळीच्या वेळी नेमलेल्या आकस्मिक क्षेत्रीय कर्मचाऱ्यांवर झालेला खर्च, कार्यालयीन खर्च, लेखन साहित्य खर्च, जाहिरात खर्च, वाहनांवरील खर्च, संकीर्ण साहित्य खरेदी, पाणी वापर संस्था स्थापनेवरील खर्च, त्यांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमावरील खर्च नसून, पीक मोजणी, पाणीपट्टी आकारणी व वसुली इत्यादी बाबींवरील केलेल्या खर्चापुरता मर्यादित नसून यात अन्य तत्सम खर्चाचा सुध्दा समावेश असेल, असा आहे;*

*२ (१७) “परिरक्षण खर्च” याचा अर्थ, कार्यचालन परिरक्षण व प्रतिबंधात्मक परिरक्षणावरील खर्च, असा आहे.*

*२ (१८) “कार्यान्वयन खर्च”याचा अर्थ, उपसा सिंचन योजनांवरील विद्युत आकार, सुटे भाग, वापराअंती संपुष्टात येणा-या बाबी यासारख्या अन्य बाबींवरील खर्चापुरताच मर्यादित नसून यामध्ये प्राधिकरणाच्या मतानुसार आवश्यक अशा अन्य बाबींवरील खर्चाचा समावेश असेल, असा आहे;*

*२ (१९) “परिचालन परिरक्षण खर्च”याचा अर्थ, पंपाद्वारे धरणाच्या गॅलरीमधील झिरप्याचे पाणी काढणे, कालव्यातील गाळ, गवत, रानटी झुडपे काढून कालव्याची वहन क्षमता पूर्ववत करणे, कालव्याचे फुटलेले भाग पूर्ववत करणे, पाण्याची गळती टाळण्यासाठी कालव्यावरील बांधकामाची दुरुस्ती करणे, खराब झालेले रबर सील व स्टेम रॉड बदलणे, प्रचलन कर्मचा-यांसाठीच्या निवासी व अनिवासी इमारतींचा दुरुस्ती खर्च यापुरताच मर्यादित न घेता यात प्राधिकरणाच्या मतानुसार आवश्यक अशा अन्य तत्सम बाबींवर होणाऱ्या खर्चाचा समावेश असेल, असा आहे;*

*२ (२०) “प्रतिबंधात्मक परिरक्षण खर्च”याचा अर्थ, रंगकाम, शिर्ष कामे, उपसा सिंचन योजना आणि कालव्यावरील नियंत्रण बांधकामे यांच्या विद्युत व यांत्रिकी चल भागांना वंगण करणे, पाण्याचे गळती मार्गावर उपाययोजना करणे, पाण्याचे गळती मार्ग तयार झाल्याने भराव फुटण्याचा धोका टाळण्याकरिता भरावामधून होणारी गळती रोखणे, सांडव्याचा पुच्छ मार्गातील धूप कमी करणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, दगडी बांधकामातील खराब झालेले सांधे (पॉइंटिंग) पूर्ववत करणे इ. बाबींवरील खर्च यापुरताच मर्यादित न घेता यात प्राधिकरणाच्या मतानुसार आवश्यक अशा अन्य तत्सम बाबींवर होणाऱ्या खर्चाचा समावेश असेल, असा आहे;*

६.२ दृष्टिनिबंध (ऑक्टोबर, २०१९) मधील तरतुदीनुसार उपरोक्त सर्व घटकांचा एकत्रित खर्च सल्लामसलत प्रक्रियेत उपभोक्त्यांसमोर अभिप्रायार्थ ठेवण्यात आला. प्राप्त झालेल्या अभिप्राय/सूचना विचारात घेऊन प्राधिकरण जी प्रचालन व परिरक्षणाची संपूर्ण रक्कम निश्चित करील त्यास “स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्च” म्हणून गणले जाईल.

## ७. वापरकर्त्यांच्या प्रवर्गांचे पुनर्विलोकन:

पूर्वीच्या जलप्रशुल्क आदेशामध्ये फक्त तीन वापरकर्त्यांचे प्रवर्ग म्हणजेच घरगुती, औद्योगिक आणि कृषी विचारात घेतले होते. घरगुती प्रवर्गामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार महानगरपालिका अंतर्गत व्यापारी उपप्रवर्ग प्रस्तावित करण्यात येत आहे .

महानगरपालिकांवर याचा परिणाम पाहून पुढील नियंत्रण कालावधी मध्ये नगरपालिका / नगरपंचायत साठी व्यापारी उपप्रवर्ग प्रस्तावित करण्यात येईल. मार्गदर्शक सूचना, २०१९ मध्ये दिलेली व्यापारी पाणीवापराची व्याख्या खालीलप्रमाणे-

*“व्यापारी पाणीवापर” याचा अर्थ, ज्यांना व्यापारी वापराकरिता पाणी पुरविले जाते अशा पाणी वापर गटाकडून, परंतु यापुरतेच मर्यादित नाही. उदा. उपाहारगृहे, हॉटेल्स, वॉटर स्पोर्ट/रिसॉर्ट, पोहण्याचे तलाव, मॉल्स, रुग्णालये, स्टेडीयम्स, बांधकामे इत्यादी अशा आणि प्राधिकरण वेळोवेळी व्यापारी वापराचे प्रवर्गाखाली गणना करेल अशा कोणत्याही क्रियेसाठीचा पाणी वापर, असा आहे.*

प्राधिकरण, औद्योगिक प्रवर्ग अंतर्गत “उद्योगातील घरगुती वापर ” हा नविन उपप्रवर्ग ग्राह्य धरित आहे. उद्योगातील घरगुती पाणीवापर म्हणजे निवासी औद्योगिक वसाहतीतील औद्योगिक कर्मचाऱ्यांनी सर्व प्रकारच्या घरगुती कारणासाठी वापरलेले पाणी. ठोक पाणी पुरवठा गटाने सदर वापर निश्चित करुन मंजूर करावा आणि आवश्यकतेनुसार स्वतंत्र मीटर बसविण्यासह पायाभूत सुविधा इत्यादी बाबत पूर्तता केल्यानंतर करारात तशी तरतूद करावी.

## ८. शासकीय अर्थसहाय्य (Subsidy):

अंदाजित प्रचालन व परिरक्षण खर्च भागविण्याकरिता जलसंपदा विभाग आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुद करेल. अंदाजित प्रचालन व परिरक्षण खर्च आणि जलप्रशुल्क आदेशानुसार लागु केलेल्या जलप्रशुल्काची अंदाजित वसुली यामध्ये महसुली तफावत आढळल्यास ते शासकीय अर्थसहाय्य मानले जाईल.

## ९. प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी :

नियंत्रण कालावधी २०१७-२० साठी काही घटकांवर आधारित तीन वापरकर्त्यांच्या प्रवर्गामध्ये प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी असलेल्या निकषावर तसेच जलप्रशुल्क प्रस्तावावर वापरकर्त्यासमवेत सल्लामसलत प्रक्रिया पार पाडल्यानंतर तर्कसंगत जलप्रशुल्क आदेश प्राधिकरणाद्वारे निर्गमित करण्यात आले. प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी ही, (अ) परवडण्याची क्षमता, (ब) प्रमाण व सुलभ उपलब्धता, (क) समयोचितता आणि (ड) पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम या चार मुलभूत घटकांवर आधारित कृषी, घरगुती आणि औद्योगिक या वापराच्या तीन प्रवर्गामध्ये करण्यात आली. सदर घटकांना खालील भारांकन टक्केवारी देण्यात आली;

| मुलभूत घटक | | भारांकन टक्केवारी |
|---|---|---|
| (अ) परवडण्याची क्षमता | - | ६०% |
| (ब) प्रमाण व सुलभ उपलब्धता | - | १०% |
| (क) समयोचितता | - | १०% |
| (ड) पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम | - | २०% |

वरील मुलभूत घटकांची भारांकन टक्केवारी वापरच्या प्रत्येक प्रवर्गाच्या तर्कधारित प्रत्येक घटकाच्या विभागणीस लागू केल्यामुळे त्याची परिणीती तीन वापरकर्त्यांच्या प्रवर्गामध्ये प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागण्यात झाली. आता, नियंत्रण कालावधी २०१७-२० च्या जलप्रशुल्क आदेशातील खर्चाच्या विभागणीची टक्केवारी जशीच्या तशी ठेवण्याचे प्रस्तावित आहे. म्हणजेच कृषीसाठी : १९%, घरगुतीसाठी : २२% आणि औद्योगिकसाठी: ५९%.

नियंत्रण कालावधी २०२२-२५ साठीचा प्रचालन व परिरक्षण खर्च हा वर्ष २०२०-२१ च्या माहितीवर आधारित असेल. त्यानंतरच्या वर्षासाठी जलप्रशुल्क प्रस्ताव तयार करतांना उपलब्ध असलेल्या नियंत्रण कालावधीसाठीच्या भाववाढीच्या अंदाजानुसार (Cost Inflation Index, Wholesale Price Index इत्यादी) दरवर्षी वाढ प्रस्तावित करण्यात येईल. यानुसार वापराच्या तिन्ही प्रवर्गाचे मूळ दर (Basic Rate) आणि स्त्रोत निहाय अनुज्ञेय दर (Applicable Rate) निश्चित करण्यासाठी प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी करण्यात येईल. सवलती

/ दंड यामुळे महसुलात येणारी तूट/आधिक्य मूळ दर निश्चित करतांना विचारात घेतले जाणार नाही.

**१०. जलप्रशुल्क निश्चित करण्यासाठीची तत्वे आणि पद्धत :**

**१०.१ कृषी :**

(१) मूळ दर हा शासकीय उपसा सिंचन योजना (उसिंयो) यांसाठीचा खर्च (विद्युत आकार, उसिंयोंच्या शीर्ष कामाचा देखभाल/ दुरुस्ती व परिचालन खर्च) वगळून १९% प्रचालन व परिरक्षण खर्चावर आधारित असेल आणि तो प्रवाही सिंचनासाठीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत नोंदणीकृत पाणी वापर संस्थांना लागू असेल.

(२) रबी हंगामासाठीचा घनमापन दर हा प्रवाही सिंचनासाठीचा मूळ दर असेल. खरीप हंगामासाठी तो मूळ दराच्या ५०% व उन्हाळी हंगामासाठी तो १५०% लागू असेल.

(३) जलप्रशुल्क आकारण्याच्या उद्देशाने कोकण व विदर्भ विभागासाठी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी खरीप, रबी, उन्हाळी हंगामाचा कालावधी खालीलप्रमाणे असेल;

| हंगाम | उर्वरित महाराष्ट्रासाठी कालवधी | कोकण व विदर्भ विभागासाठी कालवधी |
|---|---|---|
| खरीप | १ जुलै ते १४ ऑक्टोबर | १ जुलै ते १४ नोव्हेंबर |
| रबी | १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी | १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जुन | १ एप्रिल ते ३० जुन |

(४) राज्यातील शासकीय उसिंयोखालील क्षेत्रासाठी प्रवाही सिंचनासाठीचा मूळ दर (रब्बी) अधिक उसिंयोसाठीचा खर्च विद्युत आकार, उसिंयोंच्या शीर्ष कामाचा देखभाल दुरुस्ती व परिचालन खर्च यावर आधारित असेल. यापैकी १९ % खर्च संबंधित लाभार्थ्यांनी व उर्वरित ८१ % खर्च निकषानुसार इतर प्रवर्गाच्या वापरकर्त्यांमध्ये विभागण्यात येईल.शासकीय उसिंयोंसाठीचे योजना-निहाय जलप्रशुल्क संबंधित नदी-खोरे अभिकरणाच्या मुख्य अभियंता यांचे कडून जलप्रशुल्क निश्चित केले जातील.

(५) लाभक्षेत्रातील कालव्यापासून (कालव्याची व्याख्या म.पा.अ. १९७६ च्या कलम २(३) नुसार) ३५ मी. पर्यंतच्या विहिरींच्या पाण्याने सिंचित होत असलेल्या नगदी पिकांसाठी (उदा. ऊस , कापूस , केळी व फळबागा इ.) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या कलम ५५ मधील तरतुदीनुसार प्रवाही सिंचनाच्या मूळ दराच्या ५०% दर लागू असेल.

(६) पाणी वापर संस्था स्थापनेस प्रोत्साहन देण्यासाठी, वैयक्तिक शेतकऱ्यांना प्रवाही सिंचनाचा दर हा मूळ दराच्या १२५% दर लागू असेल.

(७) खाजगी उसिंयोंसाठी मूळ दराच्या ६५% नुसार अनुज्ञेय दर असेल;

**खाजगी उपसा सिंचन योजनांचे स्त्रोतनिहाय दर**

| **अ. क्र.** | **वर्गवारी** | **पाणीपुरवठा स्त्रोत** | **दर (मूळ दराच्या ६५ %)** |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | मोठ्या प्रकल्पांचे जलाशय | अनुज्ञेय दराच्या १२५% |
| २ | | मध्यम प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव | अनुज्ञेय दर |
| ३ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / उर्ध्व भागातील जलाशयाचा आधार असलेले को. प. बंधारे / जलविद्युत केंद्राचे अवजल | अनुज्ञेय दर |
| ४ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | लघु प्रकल्पांचे कालवे, जलशयाचा आधार नसलेले को. प. बंधारे व कोणताही बंधारा नसलेली अनियंत्रित व्यवस्था. | अनुज्ञेय दराच्या ५०% |
| ५ | पाणी वापरकर्त्या गटाने स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण / बंधारा | स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण / बंधारा | अनुज्ञेय दराच्या १६% |

(८) खाजगी उसियों अंतर्गत नोंदणीकृत पाणी वापर संस्थांना उपरोक्त दरात २५% सवलत देण्यात येईल.

(९) खाजगी उसियोंच्या लाभार्थ्यांनी स्वखर्चाने स्त्रोतांच्या जागी बंदिस्त वितरण नलिकेवर जलमापक यंत्र बसवावीत. संक्रमण कालावधीत जलमापक यंत्र बसवेपर्यंत खाजगी/वैयक्तिक उपसासिचंन धारकाची आकारणी क्षेत्राधारित पीकनिहाय व हंगामनिहाय करावी. मात्र ही सवलत या आदेशाच्या दिनांकापासून केवळ १ वर्षासाठी अनुज्ञेय राहील. यानंतर जलमापक यंत्र बसविले नसल्यास प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय दराच्या २ पट दराने आकारणी करावी.

(१०) खाजगी उसियो यांनी जलमापक यंत्र न बसवल्यास / जलमापक यंत्र बंद पडल्यास / जलमापक यंत्र मध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास आल्यास क्षेत्राधारित पीकनिहाय व हंगामनिहाय पाण्याचे परिमाण परिगणित करून प्रवाही जलप्रशुल्काच्या अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(११) शासन निर्णय दि. ०२/०५/२०१७ अनुसार, ठोक पाणी पुरवठा गटाने विकेंद्रीत पाणीसाठया पर्यत पाणी उपलब्ध करुन दिल्यास, संबंधित वहन व्यवस्थेच्या म्हणजेच प्रवाही किंवा उपसा अनुरुप वरील परिच्छेद १०.१ च्या उप-परिच्छेद (१), (४) आणि (६) मध्ये नमूद केल्यानुसार जलप्रशुल्क लागू राहील. जर लाभार्थ्यांने कालव्यातून बंदिस्त नलिकेद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत पाणी घेतल्यास, वहन व्यय आकारला जाणार नाही. मात्र नैसर्गिक प्रवाहाद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत नियमित पाणी पुरवठा केल्यास १०% वहन व्यय आकारले जाईल.

(१२) मत्स्यशेतीकरिता वैयक्तिक लाभधारकांसाठी सिचंनासाठीचे घनमापन दर अनुज्ञेय राहतील.

(१३) ज्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लाभक्षेत्रात भरपाईसाठी पर्यायी जमिनी दिलेल्या आहेत त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करण्यात यावी. तसेच, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उपसा सिंचन राबवल्यास अनुज्ञेय दराच्या ५०% दराने आकारणी करावी.

(१४) खरीप पिक लांबल्यामुळे रबीमध्ये पाणी घेतले अथवा रबी पिकासाठी उन्हाळी हंगामात पाणी घेतले तर लांबलेल्या सिंचनाच्या आवर्तनासाठी तत्सम खरीप / रबी दराने आकारणी करावी.

(१५) जलमापक यंत्रणा नसल्यामुळे वैयक्तिक लाभधारक अथवा पाणीवापर संस्थांना सिंचनासाठी पुरविण्यात येणा-या पाण्यावर क्षेत्राधारित पध्दतीने आकारणी करण्यात येईल. यासाठी पिकांची विभागणी बारमाही (ज्यात ऊस व केळी, फळबागा आणि कापूस येतात) आणि अन्नधान्य व इतर पिके अशा दोनच गटात करुन विहीत केलेले दर आकारले जातील, हे दर ठरविताना पुढील तत्त्वे बंधनकारक असतील-

क) जलप्रशुल्क उपरोक्त गटानुसार पिकवार आणि हंगामनिहाय असतील.

ख) अन्नधान्ये व इतर पिके याकरिता पिकांच्या किमान आधारभूत किंमतीनुसार निर्धारित पिकाच्या हेक्टरी उत्पन्नाच्या ३ ते ५ टक्के आणि बारमाही नगदी पिकांसाठी उत्पन्नाच्या ८ ते १० टक्के मर्यादेच्या आत दर राहतील याची खात्री करण्यात येईल.

ग) क्षेत्राधारित दर, पिकाखालील क्षेत्राचे भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Information System) द्वारे सर्वेक्षण करून क्षेत्र व पीक निश्चित केल्यानंतर लागू करावेत.

घ) कृषीवापरापैकी घनमापक दराने होणारी आकारणी व क्षेत्राधारित आकारणीनुसार केली जाणारी एकूण आकारणी कृषिसाठी प्रयोजित प्रचालन व परिरक्षण खर्चाची पूर्ण वसूली होईल अशा हेतूने जलप्रशुल्क निश्चित करण्यात येईल.

ड) घनमापक दराच्या आकारणीसाठी एकूण पाणीवापर आणि क्षेत्राधारित आकारणीसाठी पिकवार एकूण क्षेत्र सन २०१९-२० च्या वार्षिक सिंचन स्थितीदर्शक अहवाल आणि शासनाने दरप्रस्तावासोबत सादर केलेल्या माहितीचा आधार घेण्यात येईल.

(१६) जलसंपत्ती प्रकल्पावरील प्रथम वर्षाच्या सिंचनासाठी (चाचणी सिंचन) जलप्रशुल्काची आकारणी करू नये.

(१७) वैयक्तिक शेतकऱ्यांनी आधुनिक पध्दतीचा (सूक्ष्म सिंचन) अवलंब करून जलमापक यंत्र द्वारे घनमापन पद्धतीने पाणी घेतले तर त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५ % दराने आकारणी करावी. नोंदणीकृत पाणी वापर संस्थांनी घनमापन पद्धतीने पाणी मोजून घेऊन सुक्ष्म सिंचन केल्यास नोंदणीकृत पाणी वापर संस्थेसाठी प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय केलेल्या दराच्या ७५% दराने आकारणी करावी.

(१८) हंगाम सुरु होण्यापूर्वी त्या हंगामाच्या जलप्रशुल्काची पूर्ण आगाऊ अदायगी केली असेल तर त्या हंगामासाठी अनुज्ञेय दरामध्ये १० % सवलत दिली जाईल.

(१९) माजी मालगुजारी तलावांच्या पाणीवापराचे दर सर्वोच्च न्यायालयाच्या केस क्र. सिव्हील अपील क्र. २४७५ (१९६८) दि. १६/०८/१९७८ च्या निर्णया नुसार राहतील.

(२०) ठोक जलपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधी मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १० % दराने दंडात्मक व्याज आकारावे.

(२१) जलसंपदा विभागाची पूर्वपरवानगी न घेता सिंचनासाठी उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचा औद्योगीक वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास औद्योगीक वापरासाठी लागू असलेल्या दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

## १०.२ घरगुती :

(१) मूळ दर हा २२% प्रचालन व परिरक्षण खर्चावर आधारित असेल.

(२) मूळ घनमापन दर हा सर्व हंगामासाठी एकच असेल, व तो पुरवठाच्या स्त्रोताशी निगडित असेल.

(३) अनुज्ञेय दर महानगरपालिकांना मूळ दराच्या १२५%, इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मूळ दराच्या ९०% आणि ग्रामपंचायतींना मूळ दराच्या ७५% असेल.

(४) पाणी पुरवठ्याच्या स्त्रोत निहाय अनुज्ञेय दर खालील प्रमाणे;

## घरगुती पाणीवापराचे स्त्रोतनिहाय दर

| अ. क्र. | वर्गवारी | पाणी पुरवठ्याच्या स्त्रोत | दर |
|---|---|---|---|
| अ) | आश्वासित पाणी पुरवठा | जलाशय / कालवा नसलेले साठवण तलाव | अनुज्ञेय दर |
| ब) | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालील बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / जलाशयाचा आधार असलेला को. प. बंधारा / जलविद्युत केंद्रातील अवजल | अनुज्ञेय दराच्या २.० |
| क) | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | जलाशयाचा आधार नसलेला को. प. बंधारा / को. प. बंधारा किंवा कोणताही बंधारा नसलेली अनियंत्रित नदी | अनुज्ञेय दराच्या ५०% |
| ड) | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल | पाणी वापरकर्ता गट (ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका व तत्सम इतर संस्था) यांनी धरण / बंधारा / को.प. बंधारा याचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. | खालील टिप पहावी. |
| इ) | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली.. | पाणी वापरकर्ता गट (ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका व तत्सम इतर संस्था) यांनी धरण / बंधारा / को.प. बंधारा स्वखर्चाने बांधला. | अनुज्ञेय दराच्या १६% |
| टिप: १) मंजूर पाणी अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे अधिक असेल त्या परिमाणाच्या प्रमाणात होणारा वहनव्यय पाणी वापरकर्त्याला सोसावयाचा आहे, जलसंपदा विभागाला बाष्पीभवन व्यय सोसावयाचा आहे.<br>२) जुन्या करारासाठी पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह (Net Present Value, NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील. | | | |

(५) महानगरपालिकांसोबत अस्तित्वातील करारनाम्याचे अनुषंगाने वार्षिक मागणी मंजूर करतेवेळी व्यापारी वापराचे स्वतंत्रपणे परिमाण निश्चित केले जाईल आणि त्याला योग्य व्यापारी दर म्हणजेच महानगरपालिकेच्या अनुज्ञेय दराच्या पाच पट दर आकारला जाईल.

(६) एकात्मिक नागरी वसाहत प्रकल्प म्हणजे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम ,१९६६ मधील कलम १८ किंवा ४४ नुसार घोषित एकात्मिक नागरी वसाहत ज्यासाठी ठोक पाणीपुरवठादाराकडून थेट पाणी पुरवठा केला जातो, अशा नागरी वसाहतींकरिता दिले असेल त्याकरिता महानगरपालिकांसाठी निर्धारित केलेल्या अनुज्ञेय दराप्रमाणे दर आकारण्यात येईल.

(७) व्यापारी संस्था /खाजगी वसाहती / नागरी वसाहती (Townships) साठी बांधकाम चालू असे पर्यंत वापरलेल्या पाण्याकरिता वाणिज्य दराने म्हणजेच महानगरपालिकेच्या ५ पट अनुज्ञेय दराने जलप्रशुल्क आकारण्यात येईल व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर होणा-या वापरासाठी महानगरपालिकेचा अनुज्ञेय दर आकारला जाईल. दोन्ही वापर एकाच वेळी चालू असल्यास त्यासाठी वेगवेगळे जलमापक यंत्र बसवावेत व त्यानुसार आकारणी करावी

(८) लाभक्षेत्रातील कालव्यापासून महाराष्ट्र भूजल ( विकास व व्यवस्थापन ) अधिनियम , २००९ मधील कलम २६ मध्ये नमूद केलेल्या प्रभाव क्षेत्राच्या अंतराबाबतच्या तरतुदींनुसार क्षेत्रातील विहीरींवर ठोक पाणीवापरकर्ता गट अवलंबून असेल, तर त्यांना जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या ५०% दर लागू असेल. या ठिकाणी कालव्याची व्याख्या महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील कलम २ (३) मध्ये केल्यानुसार असेल.

(९) मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००%ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर असतील.

(१०) “प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी” या तत्वानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. नागरी स्थानिक

स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) स्थापित केलेला नसल्यास आणि/ अथवा तो पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(११) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरण्याचा हक्क आहे. मात्र प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी बंदिस्त नलिकेद्वारे अथवा टँकरने प्रक्रिया केंद्रावरून (नदी नाल्यामध्ये न सोडता) उचलणे आवश्यक राहील. असे पाणी शेतीसाठी पुरविल्यास या साठीचा दर नैसर्गिक पाण्याच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दराच्या ६०% पेक्षा जास्त नसावा. तसेच अशा पाणी वापराचा तपशील ठोक पाणीपुरवठा गटास सादर करावा. प्रक्रिया केलेले पाणी नैसर्गिक प्रवाहात सोडल्यास त्यावर ठोक पाणी पुरवठा गटाचे नियंत्रण असेल.

(१२) करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

(१३) ठोक पाणीपुरवठा गटाची पूर्वपरवानगी न घेता नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पिण्याच्या पाण्याचे पाणीहक्कातून औद्योगिक वापरकर्त्यास पाणी पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा पाणी वापरासाठी अनुज्ञेय औद्योगिक दराच्या ३.० पट दराने पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करावी.

(१४) मीटर चालू नसल्यास / काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे रिडींग दाखवत असलयाचे आढळून आल्यास मीटर दुरुस्त करण्यासाठी आणि चालू करण्यासाठी एक महिन्याची नोटीस दिली जाईल. जलमापक यंत्र ६० दिवसांमध्ये दुरुस्त करावे. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून मीटर दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. तथापि जलमापक यंत्र दुरुस्तीसाठी विहीत केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न केल्यास दंडनीय दराने म्हणजेच २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

(१५) ठोक पाणी पुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधीत मागणी केल्यानुसर जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

**१०.३ औद्योगिक :**

(१) मूळ दर हा ५९% प्रचालन व परिरक्षण खर्चावर आधारित असेल.

(२) मूळ घनमापन दर हा सर्व हंगामासाठी एकच असेल, व तो पुरवठाच्या स्रोताशी निगडित असेल.

(३) मूळ दर (BR) हे स्रोतनिहाय खालिलप्रमाणे वर्गीकरणावर आधारित असतील आणि त्याबरोबरच नैसर्गिक प्रवाहात अथवा कालव्यात सोडण्यापर्वी सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विहीत गुणवत्ते साठी शुध्दिकरण प्रक्रिया करण्याच्या अटीच्या आधीन राहील.

(४) प्रक्रिया उद्योग (Process Industry) व निर्मिती प्रक्रिया उद्दयोग (Manufacturing Industry)

४.१ प्रक्रिया उद्योग (Processing) म्हणजे ज्या उद्योगात पाण्याचा वापर प्रक्रियेकरिता म्हणजे प्रत्यक्ष वापर (Consumptive use) न होता केला जातो असा उद्योग शीतकरण अथवा स्वच्छतेच्या किंवा तत्सम कारणास्तव पाण्याचा अंतिम उत्पादनात प्रत्यक्ष वापरपाणीवापरासाठी स्रोताच्या वर्गवारीशी संबंधित असलेला अनुज्ञेय दर खालील तक्त्यानुसार आकारण्यात यावा.

४.२ "कच्चा माल म्हणून वापर होत असलेले उद्योग" म्हणजे ज्या उद्योगात पाण्याचा वापर अंतिम उत्पादनात प्रत्यक्ष वापर (Consumptive use) असतसे असे उद्योग उदा. बाटलीबंद पिण्याचे पाणी, शीतपेये ,स्पिरिट, अल्कोहोल, इथेनॉल, ब्रुअरीज व डिस्टिलरीजना किंवा तत्सम उद्दयोगांना स्रोताशी संबंधित मूळ दराच्या १५ (पंधरा) पट दर आकारण्यात यावा.

४.३ "उद्योगातील घरगुती वापर" म्हणजे संबधीत उदयोग/उपक्रमात कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांच्या निवासासाठी संबधीत उदयोगाने विकसित केलेली वसाहत असा असून त्यासाठी महानगरपालिका स्रोत्राशी संबंधित घरगुती वापराचा दर आकारण्यात यावा. तथापि,

उद्योगांसोबत करारनामा करण्यापूर्वी “उद्योगातील घरगुती वापर” याचे स्वतंत्रपणे परिमाण निश्चित करावे आणि त्यासाठी स्वतंत्र वितरण वाहिनी व जलमापक यंत्र आणि आवश्यक पायाभूत सुविधा इत्यादी बाबत पूर्तता करावी.

**औद्योगिक पाणी पुरवठयाच्या स्रोतनिहाय दर**

| अ. क्र. | वर्गवारी | पाणी पुरवठ्याच्या स्रोत | अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| अ) | आश्वासित पाणी पुरवठा | जलाशय / कालवा नसलेले साठवण तलाव | मूळ दर |
| ब) | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालील बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / जलाशयाचा आधार असलेला को. प. बंधारा / जलविद्युत केंद्रातील अवजल | मूळ दराच्या २.० |
| क) | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | जलाशयाचा आधार नसलेला को. प. बंधारा / को. प. बंधारा किंवा कोणताही बंधारा नसलेली अनियंत्रित नदी | मूळ दराच्या ५०% |
| ड) | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली. | पाणी वापरकर्ता गट (पाणी प्रक्रियेसाठी वापरणारा उद्योग किंवा पाणी कच्चा माल म्हणून वापरणारा उद्योग) यांनी धरण / बंधारा / को.प. बंधारा याचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. | खालील टिप पहावी. |

**टिप**: १) मंजूर पाणी अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे अधिक असेल त्या परिमाणाच्या प्रमाणात होणारा वहनव्यय पाणी वापरकर्त्याला सोसावयाचा आहे, जलसंपदा विभागाला बाष्पीभवन व्यय सोसावयाचा आहे.

२) जुन्या करारासाठी पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह (Net Present Value, NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील.

(५) लाभक्षेत्रातील कालव्यापासून महाराष्ट्र भूजल ( विकास व व्यवस्थापन ) अधिनियम , २००९ मधील कलम २६ मध्ये नमूद केलेल्या प्रभाव क्षेत्राच्या अंतराबाबतच्या तरतुदींनुसार क्षेत्रातील विहीरींवर ठोक पाणीवापरकर्ता गट अवलंबून असेल, तर त्यांना जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या ५०% दर लागू असेल. या ठिकाणी कालव्याची व्याख्या महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील कलम २ (३) मध्ये केल्यानुसार असेल.

(६) मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००%ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर असतील.

(७) "कृषी उद्योग" जसे साखर उद्दयोग व त्यासोबतचा सहऊर्जानिर्मिती प्रकल्प अन्नधान्य व फळ प्रक्रिया, कुक्कुटपालन, भात गिरणी, दुग्ध व्यवसाय, वनस्पतीजन्य तेल आणि तुप इ. साठी अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करावी. मात्र ऊस, मका किंवा तत्सम धान्य किंवा फळांपासून मद्दार्क, अल्कोहोल, इथेनॉल, वायनरी ब्रुवरीज, सुगंधी द्रव्ये इत्यादी निर्मितीसाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही.

(८) "प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी" तत्व - उद्योगांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. उदयोगांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (Effulent Treatment Plant) स्थापित केलेला नसल्यास आणि तो पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(९) उद्योगांनी शून्य द्रव विसर्ग (Zero Liquid Discharge) तंत्रज्ञानाचा अवलंब केला आणि त्यांच्या पाणी वितरण प्रणाली मधील व्यय, बाष्पीभवन आणि प्रक्रियेतील वापर यासाठी वाटपाच्या २५% पर्यंत पाणीवापर केला तर त्या पाणी वापरास अनुज्ञेय दराच्या फक्त २५% जलप्रशुल्क आकारले जाईल. तथापी, सदर उद्योगासाठी वार्षीक मंजूर पाणी मागणी किमान ७५% च्या मर्यादेपर्यंत वा त्यापेक्षा कमी करीत असेल तरच सदर सवलत अनुज्ञेय राहील. याबाबतची

खातरजमा कार्यकारी अभियंता यांचेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने करुन तसे लेखी प्रमाणीत करणे अनिवार्य राहील.

(१०) उद्योगांना प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरण्याचा आधिकार आहे. मात्र प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त नलिकेद्वारे अथवा टँकरने (नदी नाल्यामध्ये न सोडता) उचलणे आवश्यक राहील. असे पाणी शेतीसाठी पुरविल्यास या साठीचा दर नैसर्गिक पाण्याच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दराच्या ६०% पेक्षा जास्त नसावा. तसेच अशा पाणी वापराचा तपशील जलसंपदा विभागास सादर करावा.

(११) करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

(१२) उद्योगांनी शून्य द्रव विसर्ग ( Zero Liquid Discharge, ZLD ) तंत्रज्ञानाचा अवलंब केला आणि त्यांच्या प्रणाली मधील व्यय, बाष्पीभवन आणि प्रक्रियेतील वापर यासाठी वाटपाच्या २५% पर्यंत पाणीवापर केला तर त्या पाणी वापरास अनुज्ञेय दराच्या फक्त २५% जलप्रशुल्क आकारले जाईल.

(१३) जलमापक यंत्र बंद असल्यास/दुरुस्तीसाठी काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे रिडींग दाखवत असल्याचे आढळून आल्यास सदर जलमापक यंत्र दुरुस्त करण्यासाठी आणि पूर्ववत करण्यासाठी एक महिन्याची लेखी पूर्वसुचना देण्यात यावी. जलमापक यंत्र ६० दिवसामध्ये दुरुस्त करावे. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून जलमापक यंत्र दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. तथापी, जलमापक दुरूस्तीसाठी विहित केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न केल्यास दंडनीय दराने म्हणजेच २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

(१४) ठोक पाणी पुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधीत मागणी केल्यानुसर जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

११. **हमी शुल्क व दंडात्मक तरतूदः**

उपलब्ध पाण्याचा इष्टतम वापर व्हावा, आरक्षित पाणी विना वापर राहू नये यासाठी बिगरसिंचन वापरकर्त्यास टप्पा निहाय पाणीवापराच्या नियोजनाची मुभा देण्यात येत आहे. बिगर सिंचन पाणी वापर कर्ता त्यांना मंजूर पाणी वापराचा विनियोग टप्प्या टप्प्यात करणार असल्यास याबाबतचे नियोजन त्यांनी जलसंपदा विभागास करार करणे पूर्वी देण्यात यावे. तशी तरतुद करारात करण्यात यावी. जलप्रशुल्काची आकारणी या टप्पा नियोजनामधील पाणी वापरानुसार करण्यात यावी मात्र उर्वरित पाण्याच्या परिमाणावर (एकूण मंजूर पाणी - टप्पा नियोजनातील पाणी) ५% दराने हमीशुल्काची आकारणी करावी. तसेच प्रत्यक्ष पाणी वापर व टप्पा नियोजनातील पाणी वापर यात १०% पेक्षा जास्त विचलन असल्यास पुढील प्रमाणे आकारणी करावी.

प्रत्यक्ष पाणी वापर टप्पा नियोजनातील पाणी वापराच्या परिमाणाच्या ९०% पेक्षा कमी असल्यास टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% इतक्या परिमाणावर आकारणी करावी. प्रत्यक्ष वापर हा टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% ते १००% या मर्यादेत असल्यास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. मात्र प्रत्यक्ष वापर टप्पा नियोजनातील परिमाणाच्या १००% पेक्षा जास्त असल्यास अशा जास्तीच्या परिमाणावर अनुज्ञेय दराच्या १.५० पट दराने आकारणी करावी. तथापी , मंजूर पाणी कोट्याच्या १००% पेक्षा जास्त ते १२५ % पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दराने आकारणी करण्यात येईल.

----xxx----